होवेन्स टूमैनियन

मालक आणि कामगार

नजर बहादूर

मराठी:
वंदना पलसाने





मालक आणि कामगार

कोणी एके काळी, एका गावात दोन भाऊ रहात होते. ते खूप गरीब होते. त्यांनी ठरवले की दोघांपैकी थोरल्याने कुणा श्रीमंत जमीनदाराकडे कामगार म्हणून काम केले पाहिजे आणि आपली कमाई घरी पाठवली पाहिजे.

धाकटा भाऊ घरीच राहिला. मोठा भाऊ एका श्रीमंत मालकाकडे काम मागण्यासाठी गेला, ज्याने त्याला कामावर ठेवून घेतले.

त्यांच्यात करार असा झाला की वसंत ऋतूच्या आगमनापर्यंत कामगाराला काम करावे लागेल. जो पर्यंत कोकिळेचा पहिला सूर ऐकू येत नाही, तो पर्यंत. पण मग मालकाने या करारात अजून एक अट जोडून टाकली. “आपल्यापैकी कुणी ही दुसऱ्यावर रागावला, तर त्याला दंड पडेल. जर तू माझ्यावर रागावलास तर तू मला एक हजार रुबल देशील. आणि जर मी तुझ्यावर रागावलो तर मी तुला एक हजार रुबल देईन.”

“पण माझ्याकडे तर पैसेच नाहीत!” कामगार ओरडला.

“त्याने काय फरक पडतो? जर तू हरलास, तरी माझा नोकर म्हणून रहा आणि माझ्याकडे दहा वर्षे बिनपगारी फुकट काम कर!”

आधी तर कामगाराने नकार दयायचे ठरवले, पण मग त्याने विचार केला:

“हे पहा, मी स्वत:वर नियंत्रण ठेवू शकतो. त्यामुळे मी कधीच रागावणार नाही. जर मालकाने आपला राग आवरला नाही तर त्यालाच मला एक हजार रुबल दयावे लागतील. माझे यात काय नुकसान?”

आणि त्याने या अटी मान्य केल्या.

दुसऱ्या दिवशी सकाळी मालकाने कामगाराला शेतात काम करण्यासाठी पाठवले.

तो म्हणाला, “एक विळा घे आणि जो पर्यंत उजेड आहे तो पर्यंत गवत काप.”

अशा प्रकारे, कामगार दिवसभर शेतात काबाडकष्ट करून संध्याकाळी दमून घरी परतला की मालक त्याला म्हणे:

“अरे, इतक्या लवकर का घरी आलास?”

“म्हणजे काय? बघा, सूर्य बुडाला आहे!”

“सूर्य बुडाला म्हणून काय झालं? मी तुला सांगितलं होतं ना की उजेड असे पर्यंत काम कर! हो की नाही? सूर्य बुडाला पण चंद्र आहे ना आभाळात! त्याचा उजेड काम करण्यासाठी पुष्कळ आहे.”

“तुम्हाला काय म्हणायचे आहे? मी अजिबात आराम करायचा नाही?” कामगार ओरडला.

“अच्छा, तुला राग आला आहे तर?”



“नाही नाही, अजिबात नाही... मी बिलकुल रागावलो नाही. मी फक्त थकलो आहे. बस्स, थोडा आराम करेन आणि मग पुन्हा शेतावर जाईन.”

त्याने मग चंद्र बुडे पर्यंत रात्रभर काम केले. पण मग पुन्हा सूर्य उगवला. बिचारा थकून जमिनीवर कोसळला. आणि आपल्या मालकाला शिव्या दयायला लागला.

“तुझे शेत, तुझे अन्न, आणि तुझे पैसे, सगळं गेलं खड्ड्यात!” कामगार ओरडला.

त्या क्षणी मालक त्याच्या जवळ आला आणि म्हणाला:

“अच्छा!! तुला राग येतो आहे तर! आपला करार विसरू नकोस. आता एक तर मला एक हजार रुबल दे, नाहीतर दहा वर्ष माझ्याकडे विना वेतन काम कर.”

कामगाराला कळत नव्हते काय करावे! त्याच्या जवळ पैसे नव्हते. पण अशा कठोर मालकाकडे तो काम ही करू शकत नव्हता. शेवटी, त्याने एका कागदावर सही केली ज्यात लिहिले होते की त्याच्यावर मालकाचे हजार रुबलचे कर्ज आहे. मग तो रिकाम्या हाती आपल्या घरी निघून गेला.

धाकट्या भावाने विचारले काय घडले म्हणून, तर थोरल्याने सगळी कहाणी सांगितली.

“काही हरकत नाही. तू अजिबात चिंता करू नकोस.” धाकटा म्हणाला. “आता तू घरी रहा, मी जाऊन काम शोधतो.”

धाकटा भाऊ त्याच मालकाकडे गेला, जिथे त्याचा मोठा भाऊ काम करत होता.

मालकाने पुन्हा त्याच अटी ठेवल्या. जर कामगाराला राग आला तर त्याने मालकाला एक हजार रुबल दंड दयायचा, नाहीतर दहा वर्षं विना वेतन काम करायचे. आणि जर मालक रागावला तर त्याने कामगाराला एक हजार रुबल दयायचे आणि त्याला कामावरून मुक्त करायचे.

“नाही, हे पुरेसे नाही,” धाकटा म्हणाला. “बघा, जर तुम्ही माझ्यावर रागावलात तर तुम्ही मला दोन हजार रुबल द्या, आणि जर मला राग आला तर मी पण तुम्हाला दोन हजार रुबल देईन, किंवा विना वेतन तुमच्या कडे वीस वर्षं काम करेन!”

“एकदम छान कल्पना!” मालक उत्साहाने किंचाळला, आणि त्याने लगेच धाकट्याला कामावर ठेवून घेतले.

दुसऱ्या दिवशी सकाळी सूर्य चांगलाच वर आला. मालक पाहतो तर काय कामगार अजून गाढ झोपला आहे.

“उठ आता! जवळजवळ दुपार झाली आहे, आणि तू अजून कामावर गेला नाहीस!”

“तुम्हाला राग येत आहे का?” कामगाराने अचानक डोळे उघडून विचारले.

“नाही रे, मी अजिबात रागावलेलो नाही!” मालक पटकन म्हणाला, “मी फक्त सुचवत आहे की आता कामाची वेळ झाली आहे, तर तू शेतावर जाऊन गवत कापायला सुरुवात करावीस.”

“त्यासाठी अजून पुष्कळ वेळ आहे!!” कामगाराने आळस देत उत्तर दिले.

शेवटी तो उठला आणि हळू हळू आपले बूट घालायला लागला.

“तू थोडी घाई नाही का करू शकत?”

“का? तुम्हाला राग येतोय का?”

“नाही, नाही, मी एवढंच म्हणतो आहे की तुला कामावर जायला उशीर होईल.”

“हं, ते वेगळं! पण तुम्ही आपला करार मात्र लक्षात ठेवा. तुम्हाला माहीत आहे, तुम्हाला तो पाळावा लागेल.”

जो पर्यंत कामगार तयार होऊन शेतावर पोहोचला, तोपर्यंत दुपार होऊ लागली होती. आता काम करून काय फायदा? खूपच उशीर झाला होता. पहा, सगळे जण दुपारचे जेवण करत होते. “चला, मी पण जेवून घेतो,” कामगार म्हणाला.

मग त्याने इतरांसोबत बसून जेवण केले. त्या नंतर तो म्हणाला, “मी एक कामगार माणूस आहे. आपली ताकद टिकवून ठेवण्यासाठी मला एक छोटी झोप काढली पाहिजे.” असे म्हणून तो झोपून गेला आणि संध्याकाळ पर्यंत झोपून राहिला.

“लवकर उठ! तुला लाज नाही वाटत?” मालकाने त्याला जोराने हलवत उठवले. “शेजाऱ्यांच्या शेतात कापणी सुद्धा पूर्ण झाली, आणि आपले शेत अजून तसेच्या तसे आहे! कसा कामगार आहेस तू!”

“मला वाटतंय या वेळी तुम्ही खरेच खूप चिडला आहात!” कामगाराने मान वर करत म्हटले.

“नाही, नाही. अजिबात नाही. मी तर इतकंच म्हणतो आहे की आता घरी जायची वेळ झाली आहे.”

“बरोबर, एकदम बरोबर. चला तर घरी जाऊया.”

जेव्हा ते घरी पोचले, तेव्हा मालकाने पाहिले की एक पाहुणा त्याची वाट पहात घरी थांबला आहे. मालकाने कामगाराला पाहुण्याच्या जेवणासाठी एक बकरा मारून आणायला पाठवले.

“मी कोणता बकरा मारू?” कामगाराने विचारले.

“कुठलाही! ज्याला तू पकडू शकशील असा कोणताही!” मालक म्हणाला.

कामगार तिथून गेला. पाठोपाठ शेजारी धावत मालकाकडे आले आणि म्हणाले, “तुझा कामगार वेडा झाला आहे, त्याने तुझे सगळे बकरे मारून टाकले आहेत!”

मालक पळत बाहेर गेला आणि पाहतो तर काय? त्याच्या सगळ्या बकरे-मेंढ्या मरून पडले आहेत.



“काय केलंस तू हे, धिक्कार असो तुझा!” मालक ओरडला. “तू मला बर्बाद केलेस! देव तुला याची चांगलीच शिक्षा देईल!”

“पण तुम्हीच मला सांगितलं की मी ज्याला पकडू शकेन त्या बकऱ्याला मारावे. मी सगळ्यांना पकडू शकलो,” कामगार अगदी विनम्रतेने उद्‌गारला. “तुम्ही रागावला आहात, असे तर नाही?”

“नाही, नाही. अजिबात नाही. मला केवळ माझ्या बकऱ्यांच्या मरण्याचे दु:ख झाले आहे.”


कामगार म्हणाला, “ मग ठीक आहे. जर तुम्ही माझ्यावर रागावला नसाल, तर मी तुमच्याकडे काम करूच शकतो.” असे म्हणून तो अजून काही महिने तिथे काम करत राहिला. आपल्या करामतींनी त्याने मालकाला जवळजवळ वेडे केले. शेवटी, मालकाने त्याच्यापासून आपला पिच्छा सोडवून घ्यायचे ठरवले.

त्यांच्या करारातील अटीनुसार, जंगलात कोकिळेचे पहिले सूर ऐकू येईपर्यंत कामगाराने काम करायचे ठरले होते. मालकाने या अटीचा फायदा घ्यायचे ठरवले. खरं तर, आत्ताच हिवाळा सुरु झाला होता आणि कोकिळेचे गायन ऐकू यायला अजून पुष्कळ वेळ होता. म्हणून मग मालक आपल्या पत्नीला आपल्या सोबत जंगलात घेऊन गेला. त्याने तिला झाडावर चढायला मदत केली आणि तिला तिथेच बसून राहायला आणि कोकिळे प्रमाणे कू-कू करायला सांगितले. मग तो घरी गेला आणि त्याने कामगाराला सांगितले की चल, आपण जंगलात शिकारीला जाऊ.

त्यांनी जंगलात प्रवेश करताच मालकाची बायको ओरडू लागली, “कू-कू! कू-कू!” मालक कामगाराकडे वळला आणि म्हणाला, “अभिनंदन! ही पहा ऋतूच्या पहिल्या वहिल्या कोकिळेची कू-कू! आता तू मुक्त आहेस!”

मालकाची लबाडी कामगाराच्या लक्षात आली.

“नाही,” तो म्हणाला, “हिवाळ्याच्या सुरुवातीला कोकीळ कशी कूक करेल? ही काहीतरी वेगळ्याच प्रकारची विचित्र कोकीळ असणार. मी तिला शूट करतो, आणि तिला जरा नीट पाहतो!”



असे म्हणून त्याने आपली बंदूक उचलली आणि मालकाची पत्नी बसली होती त्या झाडाकडे निशाणा साधला.

मालक कामगारावर तुटून पडला आणि त्याच्याकडून बंदूक ओढून घेऊ लागला. "तुला शाप लागेल माझा, तू एक डाकू आहेस! मी आता तुझ्या लबाड्या अजून सहन करू शकत नाही!"

"ओहो! आता तुम्ही मान्य करत आहात ना की तुम्ही खरंच चांगलेच चिडला आहात," कामगार उत्सुकतेने ओरडला.

"हो, हो, मी चिडलो आहे! मी मान्य करतो!" मालक म्हणाला. "घे, तुझे दोन हजार रुबल मी तुला देतो. ते घे आणि इथून चालता हो. आता मला त्या जुन्या म्हणीचा अर्थ चांगलाच कळला आहे, "कधीही दुसऱ्यांसाठी खड्डे खणू नका, कशा वरून एक दिवस तुम्हीच त्यात पडणार नाही!"

अशा प्रकारे तो धाकटा भाऊ आपल्या खिशात हजार रुबल घेऊन घरी निघून गेला.





नजर बहादूर

कोणे एके काळी एक शेतकरी होता. त्याचे नाव होते नजर. तो अतिशय आळशी, बिनकामाचा आणि भित्रा होता. इतका भित्रा की एकट्याने एक पाऊल सुद्धा उचलायला तो भीत असे. सारखा आपल्या बायकोचा स्कर्ट धरून फिरत असे. ती जाईल तिथे, तिच्या मागे मागे करत असे. लोकांनी त्याचे नावच मुळी "भित्रा नजर" ठेवले होते.

एके रात्री असाच भित्रा नजर आपल्या पत्नीच्या मागे गेला. दाराबाहेर जाऊन उभा राहिला आणि पाहतो तर काय, सगळा आसमंत स्वच्छ चांदण्यात चमचम करत होता. ते पाहून तो म्हणाला:

"ही रात्र माझ्यासाठी आहे! तो पहा, तो तांडा हिंदुस्तानातून शाहच्या शहराकडे जात आहे. माझी इच्छा त्या तांड्यावर हल्ला चढवून त्याला लुटण्याची आहे. त्यामुळे माझे घर धन-संपत्तीने भरून जाईल."

"गप्प बस, मूर्खा! तुझ्यासारखा भित्रा माणूस एक मोठा काफिला लुटण्याची हिम्मत करेल! आपल्या बिछान्यावर जा आणि तिथेच पडून रहा, आणि आराम कर!"

यावर नजरने आपल्या बायकोवर ओरडायला सुरुवात केली.

"तू मूर्ख बाई आहेस! तू मला शाहचा तांडा लुटण्यापासून आणि आपले घर संपत्तीने भरण्यापासून रोखते आहेस! मी एक मर्द आहे की नाही आहे? माझ्याबरोबर वाद घालायची तुझी हिम्मतच कशी झाली?"

त्याचा राग असा वाढलेला पाहून आणि तो कमी होत नाही हे पाहून त्याची बायको घरात गेली आणि तिने आतून दरवाजा बंद करून घेतला.

"जा, लुटू शकत असलास तर जरूर लूट शाहचा तांडा, भित्र्या माणसा!" बायकोने टोमणा मारला.

नजर अंगणात उभा राहिला. आता मात्र त्याला काही समजेना.

"मला आत येऊ दे! कृपा करून मला आत येऊ दे!" तो गयावया करू लागला.

पण बायकोने काही दरवाजा उघडला नाही. थोडा वेळ नजर विनंत्या करत तिथेच थांबला, शेवटी हताश होऊन एका भिंतीला टेकून बसला आणि सकाळ पर्यंत थंडीत कुडकुडत तिथेच वाट पहात राहिला.

रात्र संपली आणि सकाळ झाली. नजर उन्हात अस्वस्थ पेंगत होता आणि पत्नीने दरवाजा उघडून त्याला आत येऊ देण्याची वाट पहात होता. उन्हाळ्याचे दिवस होते आणि सगळीकडे माश्याच माश्या होत्या. असाच माश्यांचा एक तांडा त्याच्या चेहऱ्यावर येऊन बसला.

आधी तर, कारण की तो इतका आळशी होता की हात उचलून माश्यांना हाकलण्याचा सुद्धा त्याने प्रयत्न केला नाही. शेवटी, माश्यांचा जाच अजून सहन न झाल्यामुळे त्याने आपल्या कपाळावर जोराने हात मारला. त्याबरोबर, त्याच्या चहूकडे खूप साऱ्या मेलेल्या माश्या पडल्या.

“आहा!” नजर पुटपुटला, “ किती चकित करणारी गोष्ट आहे नाही? मी इतक्या ढीगभर माश्या एका दमात मारून टाकल्या!”

त्याने मेलेल्या माश्या मोजायला सुरुवात केली, पण लवकरच तो मोजलेले अंक विसरला.

“तरी पण, कमीत कमी हजार तर असतीलच,” त्याने विचार केला. “मला माहीतच नव्हते की माझ्यात एवढा दम आहे! जर कुणी एका फटक्यात एक हजार प्राणी मारू शकत असेल, तर मला खात्री आहे की तो माणूस आपल्या बायको शिवाय निश्चित राहू शकेल!”

मग तो उठला आणि सरळ गावच्या पुजाऱ्याला भेटायला गेला.

“बाबा, मला आशीर्वाद दया.”

पुजारी म्हणाला, “देव तुझे भले करो, बेटा.”

“त्याचं काय आहे ना बाबा,” नजर सुरु झाला आणि त्याने पुजाऱ्याला आपल्या पराक्रमाविषयी सांगितले. त्याबरोबर असेही सांगितले की तो आता आपल्या पत्नीला सोडून देणार आहे. त्याने पुजाऱ्याला त्याचा पराक्रम लिहून ठेवायला सांगितला. म्हणजे मग त्याचा पराक्रम लोकांपासून अज्ञात रहाणार नाही. सगळे त्याबद्दल वाचतील आणि सर्वांना त्याबद्दल कळेल.

गंमत म्हणून पुजाऱ्याने एका जुन्या फडक्यावर लिहिले:

“नजर बहादूर, ज्याला भीती माहीत नाही,

एका फटक्यात तो हजारोंना मारून टाकतो!”



पुजाऱ्याने लिहिलेले ते जुनेरे नजरला दिले. नजरने त्याला एका लांब काठीला बांधले. एक जुनी गंज चढलेली तलवार आपल्या बेल्टला अडकवली आणि आपल्या गाढवावर स्वार होऊन तो गावाबाहेर पडला.

नजर पुढे पुढे जात राहिला. त्याला माहीत नव्हते तो कुठे चालला आहे ते. थोड्या वेळाने जेव्हा त्याने मागे वळून पाहिले तेव्हा त्याला दिसले की गाव तर खूपच मागे राहिले आहे. त्याबरोबर तो घाबरला. पण आपले साहस टिकवून ठेवण्यासाठी त्याने कधी गुणगुणायला, कधी जोरजोरात गाणे म्हणायला, तर कधी स्वत:शी बोलायला आणि गाढवावर बसून ओरडायला सुरुवात केली. तो इतक्या जोरजोरात ओरडत होता की शेवटी त्याचे गाढव सुद्धा उत्तरादाखल ओरडायला लागले.

ते दोघे अजून पुढे गेले. एक ओरडत होता तर दुसरा अजूनच जोरजोरात किंचाळत होता. ज्यांनी ज्यांनी ऐकले, ते सगळे घाबरले, पक्षी उडून गेले, ससे जंगलात पळून गेले आणि बेडकांनी टर्र-टर्र करत पाण्यात उड्या मारल्या.

जंगलात पोचल्यावर नजर आधीपेक्षा ही जास्त घाबरला. त्याला वाटू लागले की प्रत्येक झुडूपामागे आणि झाडामागे एखादे जंगली जनावर किंवा डाकू लपले आहेत, जे त्याच्यावर हल्ला करायला टपून बसले आहेत. आता तर तो जितके शक्य होईल तितके जोरात ओरडू लागला. हे ओरडणे कुणाही ऐकणाऱ्याच्या हृदयात दहशत निर्माण करायला पुरेसे होते.

आणि मग तसेच घडले. शेजारच्या गावातला एक शेतकरी आपल्या घोड्याची लगाम पकडून जंगलातील रस्त्याने त्यांच्या दिशेने येत होता. जेव्हा त्याने हे भयंकर ओरडणे ऐकले तेव्हा तो भीतीने थरथरू लागला आणि किंचाळू लागला, “अरे देवा! डाकू!” आपल्या घोड्याला तिथेच रस्त्यावर सोडून तो जंगलात लपायला पळून गेला.

त्या माणसाने जिथे आपला घोडा सोडला होता तिथे नजर पोचला. त्याने कुणी स्वार नसलेला, काठी आणि लगाम बांधलेला घोडा पाहिला. या पेक्षा अजून त्याला काय पाहिजे होते? तो लगेच गाढवावरून उतरला, घोड्यावर स्वार झाला आणि पुढे निघाला.

नजर किती दूरवर गेला, त्याने लांब पल्ला गाठला की छोटा, त्यालाच माहीत. पण काही वेळाने एक गाव लागले. तो आधी कधी तिथे गेला नव्हता आणि पुढे कुठे जायचे हे सुद्धा त्याला माहीत नव्हते. अचानक त्याला छान संगीत ऐकू आले. त्या दिशेने पुढे जाताना त्याला दिसले की बरेचसे लोक कुठल्याशा लग्नाच्या मेजवानी साठी तिथे जमले आहेत.

“नमस्कार!”

“तुम्हाला पण नमस्कार, अनोळखी इसमा! आमच्या आदर-सत्काराचा स्वीकार करावा. आमचे पाहुणे व्हावे.”

त्यांनी नजरला सन्मानाने एका जागी बसवले आणि त्याच्यासाठी पुष्कळ दारू आणि भोजन आणले. तिथे आलेले इतर पाहुणे या नव्या पाहुण्याला पाहून चकित होते आणि विचारात पडले होते की ही व्यक्ती कोण असू शकेल? त्याच्या उजवीकडे बसलेल्या व्यक्तीने त्याच्या उजवीकडे बसलेल्या व्यक्तीला कोपराने ढोसले, तर त्याने त्याच्या पुढच्या व्यक्तीला तसेच ढोसले. असे करत करत तिथे बसलेल्या पुजाऱ्याला कोपर ढोसले गेले, जो नजरच्या डावीकडे बसला होता. त्याने नजरकडे असलेल्या “बॅनर” कडे पाहिले आणि त्यावर जे लिहिले होते ते वाचले.

“नजर बहादूर, ज्याला भीती माहीत नाही,

एका फटक्यात तो हजारोंना मारून टाकतो!”

पुजाऱ्याने विस्मयचकित होऊन ही गोष्ट आपल्या डावीकडे बसलेल्या व्यक्तीला सांगितली, त्याने तीच गोष्ट आपल्या शेजाऱ्याच्या कानात सांगितली. असे करत करत ही बातमी टेबलाच्या चहूबाजूने फिरत फिरत शेवटी नजरच्या उजवीकडे बसलेल्या पाहुण्यापर्यंत येऊन पोचली.

सर्वजण अतिशय प्रभावित झाले, जेव्हा त्यांना कळले की त्यांचा पाहुणा कुणा योद्ध्यापेक्षा कमी नाही.

“नजर बहादूर, ज्याला भीती माहीत नाही,

एका फटक्यात तो हजारोंना मारून टाकतो!”

अचानक पाहुण्यांपैकी एक, जो अत्यंत गर्विष्ठ म्हणून प्रसिद्ध होता, ओरडला, “काय, खरे की काय! हा बहादूर नजर आहे! केवढा वेगळा दिसतोय आता. मी तर ओळखूच शकलो नाही.”

त्या नंतर इतर लोकांपैकी अनेकांनी नजर बहादूरला ओळखत असल्याचे सांगून आठवणी सांगायला सुरुवात केली, आणि त्याने केलेल्या महान कार्यांविषयी कहाण्या सांगितल्या. ते सांगायला विसरले नाहीत की ते त्याला किती अधिक काळापासून ओळखतात आणि त्यांनी किती काळ एकत्र व्यतित केला आहे.



"इतकी महान व्यक्ती नोकरांशिवाय कशी काय बुवा प्रवास करू शकते?" काही शंकेखोरांनी विचारले.

"कशी म्हणजे? याचे कारण साधे आहे, त्यांना नोकर ठेवणे पसंत नाही. ते म्हणतात, "जर सगळे जग माझी सेवा करण्यासाठी तत्पर असते, तर मला नोकर ठेवायची गरजच काय?"

"ते इतकी जुनी गंजलेली तलवार का बाळगतात?"


"अरे, ही तलवार त्यांच्या शौर्याचा पुरावा आहे. एका चांगल्या तलवारीने तर कुणीही शूरवीर बनू शकतो, पण नजर आपल्या या गंजलेल्या तलवारीच्या एका वाराने हजारो लोकांना मारून टाकू शकतो."

सर्व पाहुण्यांनी मग नजर बहादूरच्या स्वास्थ्यासाठी कामना करत दारू प्यायली आणि उपस्थितांपैकी सर्वात महत्वाच्या व्यक्तीने एक भाषण केले.

"तुमच्या कारकिर्दीची प्रसिद्धी आमच्या पर्यंत आधीच पोहोचली होती, नजर बहादूर! आज तुम्हाला आमच्यामध्ये पाहून आम्ही स्वत:ला भाग्यवान समजत आहोत!"

नजरने फक्त एक श्वास सोडला आणि आपला हात हलवला. पाहुण्यांनी अर्थपूर्ण नजरांनी एकमेकांकडे पाहिले आणि असे दाखवायचा प्रयत्न केला की त्यांना नजरच्या श्वास सोडण्याचा आणि हात हलवण्याचा मतितार्थ चांगलाच समजला आहे.

मग लोक उठले आणि त्यांनी नजरच्या सन्मानार्थ एक गीत गायले.



“तुमचे स्वागत आहे, नजर बहादूर!
आम्ही तुमच्या शक्तीची प्रशंसा करतो,
आमच्या उंच पहाडांवर भरारी घेणाऱ्या महान गरुडा!
आमच्या भूमीचा मुकुट आणि कीर्ती, आमचा प्रकाश!
नजर बहादूर, ज्याला भीती माहीत नाही,
एका फटक्यात तो हजारोंना मारून टाकतो!”
“कमजोरांचा मसीहा, रुग्णांचा तारणहार,
वेदना, शोक आणि फसवणुकीतून तारणारा आमचा उद्धारकर्ता,
विनयशील आणि सहनशील लोकांना अन्यायापासून वाचवणारा!
नजर बहादूर, ज्याला भीती माहीत नाही,
एका फटक्यात तो हजारोंना मारून टाकतो!”
“आम्ही तुझ्यासाठी बळीच्या बकऱ्यांप्रमाणे असू,
तुझा बॅनर, तुझी तलवार आणि तुझ्या घोड्यासाठीही,
आणि त्याच्या आयाळी आणि शेपटी आणि नालासाठी ही!
नजर बहादूर, ज्याला भीती माहीत नाही,
एका फटक्यात तो हजारोंना मारून टाकतो!”
आणि जसे सगळे दारुडे इकडे तिकडे विखुरले,
जिथे जिथे ते गेले, नजरचे गुणगान गाऊ लागले,
“नजर बहादूर, ज्याला भीती माहीत नाही,
एका फटक्यात तो हजारोंना मारून टाकतो!”

त्यांनी लोकांना नजरच्या उल्लेखनीय कामगिऱ्यांबद्दल सांगितले आणि त्याच्या भयंकर रूपाचे वर्णन केले.

त्यानंतर लोक आपल्या नवजात मुलांचे नाव नजर ठेवू लागले.

नजरने लग्नाची मेजवानी सोडली आणि आल्या वाटेने पुढे निघाला. एका हिरव्यागार गवताच्या कुरणापाशी पोहोचल्यावर तो घोड्यावरून उतरला आणि त्याने आपल्या घोड्याला चरायला मोकळे सोडून दिले. आपला बॅनर जमिनीत रोवला आणि त्याच्याखाली झोपावे म्हणून पहुडला.

आता झाले असे की शेजारच्याच एका डोंगराच्या शिखरावर असलेल्या महालात सात योद्धे भाऊ रहात होते. महालातून खाली पाहताना त्यांना आपल्या शेतात कुणीतरी झोपलेले दिसले, आणि त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला.


“कोण बरं इतका शूर आणि ताकतवान असू शकेल जो आमच्या जमिनीवर अतिक्रमण करण्याचे धाडस करतोय? इतकेच नाही, तर तिथे झोपून पण जातो आहे?” त्यांनी विचार केला. मग ते आपल्या महाकाय गदा घेऊन खाली मैदानात उतरले, हे पाहायला की हा अतिक्रमण करणारा नेमका कोण आहे. त्यांना दिसले की एक घोडा जवळच गवतावर चरत आहे, आणि एक माणूस एका बॅनर खाली जमिनीवर झोपलेला आहे. आणि त्या बॅनरवर लिहिलेले आहे:


“नजर बहादूर, ज्याला भीती माहीत नाही,

एका फटक्यात तो हजारोंना मारून टाकतो!”

“आहा! हा तर खुद्द नजर बहादूर आहे!” ते आश्चर्यचकित होऊन ओरडले. दारूच्या नशेत लग्नाला आलेल्या वऱ्हाडी मंडळींनी नजरची ख्याती दूर दूर पसरवली होती. त्यामुळे ते योद्धे तिथेच उभे राहून नजर जागा होण्याची वाट पहात थांबले.

जेव्हा नजर उठला आणि त्याने पाहिले की सात महाकाय वीर आपल्या विशाल गदा घेऊन त्याच्या डोक्यावर उभे आहेत, तेव्हा त्याची भीतीने बोबडीच वळली. आणि त्याने पटकन आपल्या बॅनरच्या खांबामागे लपण्याचा प्रयत्न केला. त्याला भीतीने असा पिवळा पडलेला आणि थरथर कापत असलेला पाहून वीरांनी विचार केला की हा तर भयंकर चिडलेला दिसतोय. एकाच फटक्यात त्यांना





संपवून टाकेल. म्हणून ते त्याची विनवणी करण्यासाठी आपल्या गुडघ्यांवर बसले आणि म्हणाले, “तुम्हीच का ते जनाब नजर बहादूर, ज्यांना भीती म्हणून माहीत नाही! आम्ही तुमच्या बद्दल खूप ऐकले आहे, आणि तुमच्या इथे येण्याने आमचा मान वाढला आहे. आमचा महाल तिथे पलीकडे त्या डोंगरावर आहे. आमची एक सुंदर बहीण आहे, ती आमच्याच सोबत राहते. आमची विनंती आहे की आपण आमच्या महालात यावे आणि आमचा पाहुणचार स्वीकारावा!” नजरने स्वत:ला सावरले आणि तो आपल्या घोड्यावर स्वार झाला. ते सात वीर मग त्याला आणि त्याच्या बॅनरला घेऊन त्यांच्या महालात आले.

तिथे पोचल्यावर त्यांनी मोठ्या सन्मानाने नजरचे स्वागत केले. त्याच्या साहसाची आणि पुरुषी गुणांची त्यांनी इतकी प्रशंसा केली की त्यांची बहीण, सुंदर इयर, नजरच्या प्रेमातच पडली. एकूणच नजरचे ग्रह चांगलेच चमकत होते. त्याला प्रचंड मान सन्मान मिळत होता आणि तो वाढतच चालला होता.

त्याच वेळी त्या प्रदेशात एक प्रचंड मोठा जंगली वाघ प्रकट झाला. सगळे भयभीत झाले. एकमेकांना विचारू लागले, “या भयानक वाघापासून आपल्याला कोण बरे वाचवेल? अरे! निश्चितच बहादूर नजर! दुसरा आहेच कोण जो या भयंकर प्राण्याचा सामना करण्याची हिम्मत करेल?”

सगळ्याच्या नजरा नजरकडे वळल्या: जसे देव स्वर्गात होते, तसाच बहादूर नजर पृथ्वीवर होता.

मात्र जसा नजरने “वाघ” हा शब्द ऐकला, तो इतका घाबरला की तिथून पळतच सुटला. आता त्याला जितक्या लवकर त्याचे पाय नेतील तितक्या लवकर आपल्या घरी पोचायचे होते. पण लोकांना वाटले की नजर आपल्या नि:शस्त्र हातांनी वाघाला मारण्यासाठी पळाला आहे. त्याच्या सौंदर्यवती वधूने त्याला थांबवले:

“थांब, थांब, माझ्या वीरा! असा नि:शस्त्र जाऊ नकोस!”

नजरला शस्त्रे दिली गेली. ती घेऊन तो आपल्या घोड्यावर स्वार झाला आणि तिथून सरपट पळाला. त्याला माहीतही नव्हते, ना पर्वा होती की तो कुठे जात आहे. त्याला फक्त तिथून जितके शक्य होईल तितके लांब पळून जायचे होते. एका जंगलात येऊन त्याने घोड्यावरून उडी मारली आणि तो एका झाडावर चढून बसला. आपण इथे सुरक्षित राहू या विचाराने तो एका फांदीला चिकटून बसून राहिला. आत्यंतिक भीतीमुळे, तो जिवंत असण्यापेक्षा मृतप्रायच अधिक होता. त्याचे हृदय जोरजोरात धडधडत होते. आता नजरचे नशीबही बघा असे की वाघही त्याच झाडाखाली येऊन पहुडला ज्या झाडावर नजर बसला होता. नजरची नजर वाघाला पडली आणि त्याचे रक्त भीतीने गोठले, त्याच्या डोळ्यासमोर अंधारी आली. त्याच्या हातांची पकड ढीली झाली, फांदी सुटली आणि तो सरळ धडाम करून वाघाच्या पाठीवर जाऊन पडला.

अचानक झालेल्या या आघाताने वाघ इतका भयचकित झाला की त्याने मोठ्ठी उडी मारली आणि तो डोंगर आणि दऱ्यांमधून वेगाने पळू लागला. नजर आपला जीव वाचवण्यासाठी वाघाच्या पाठीला अजूनच घट्ट चिकटला. ज्यांनी त्याला पाहिले ते ओरडू लागले:

“बघा, बघा! नजर बहादूरने वाघाला वश केले आहे, आणि आता तो घोड्याप्रमाणे वाघावर स्वार झाला आहे!”

मग त्या सर्वांनी आपापले खंजीर, बंदुका आणि तलवारी बाहेर काढल्या आणि वाघाचा पाठलाग करून त्याला मारून टाकले.


पुन्हा एकदा सावधगिरीने आपले बुद्धि चातुर्य वापरत नजर म्हणाला:

“किती दु:खद गोष्ट आहे की तुम्ही लोकांनी या प्राण्याला मारून टाकले! मी त्याला आत्ताच तर वश केले होते. मला घोड्याप्रमाणे त्याच्यावर स्वारी करायची होती.”

थोड्याच वेळात ही बातमी दूर-दूर पर्यंत पोचली. महालात नजरचे भव्य स्वागत झाले. सर्व लोक त्याचे महिमा मंडन करणारे गीत गाऊ लागले:

“सगळ्या सृष्टीत
कोणत्याही देशी
कोण आहे तुझ्या बरोबरीचा,
जो नाही तुझा गुलाम
हे नजर बहादूर?”
“जसे बिजलीने कडाडावे
वा करावे ससाण्याने आक्रमण
तू तत्परतेने आम्हाला वाचवलेस
ओ नजर बहादूर!”
“वाघाचा माग काढत
जणू तो आहे तुझा घोडा
तू त्याच्यावर स्वार होऊन
डोंगर-दऱ्यांना केलेस सर
हे नजर बहादूर!”
“हे उद्धारकर्त्या! तू आम्हाला मुक्त केलेस!
हे उद्धारकर्त्या! आता आमचे ऐक!
आम्ही कायम तुझी स्तुती करू,
अशीच कृपा आमच्यावर असू दे!
हे नजर बहादूर!”

नजर बहादूरने त्या सात योद्ध्यांच्या बहिणीसोबत विवाह केला, तो सोहळा सात दिवस आणि सात रात्र रंगला. त्याच्या आणि त्याच्या वधूच्या प्रशंसेची गीते गायली गेली.



“जो चंद्र डोंगरामागे उगवला आहे

तो कुणासारखा आहे?

जो चंद्र डोंगरामागे उगवला आहे

तो नजर बहादूर स्वत: आहे!

“सूर्य आपले संपूर्ण तेज घेऊन उगवला आहे

तो कुणासारखा आहे?

सूर्याची सगळी महिमा

ती तर नजर बहादूरची गोरी वधू आहे!

“बघा, आमचा कुलीन राजा किती न्यायप्रिय आहे

बघा, त्याचा चमकता सूर्य किती प्रकाशमान आहे

त्याचा मुकुट किती उज्ज्वल - सर्वाधिक उज्ज्वल

त्याची वस्त्रे किती उज्ज्वल - सर्वाधिक उज्ज्वल

त्याचा बेल्ट किती उज्ज्वल - उज्ज्वल उज्ज्वल

आणि बूट किती चमकत आहेत - सर्वाधिक चमकणारे

त्याची राणी किती उज्ज्वल आहे - सर्वाधिक उज्ज्वल

आम्ही तुला आणि तुझ्या राणीला वंदन करतो

हे परम तेजस्वी राजा, हे सूर्या

आम्ही तुला नमन करतो - तुझा जयजयकार असो!

“बहादूर नजर! तुझा जयजयकार असो!

आणि तुझ्या उज्ज्वल राणीचा जयजयकार असो!

सगळे विश्व तुझा जयजयकार करेल - सगळे विश्व!”

पण गोष्ट इथेच संपत नाही.

झाले असे की शेजारी देशाचा राजा या सात महान योद्ध्यांच्या बहिणीशी स्वत: विवाह करण्यास इच्छुक होता. त्याने जेव्हा ऐकले की योद्ध्यांनी तिचे लग्न नजर सोबत लावून दिले आहे तेव्हा त्याने युद्धाची नुसती घोषणाच केली नाही तर योद्ध्यांच्या महालावर हल्ला पुकारला.

योद्धे भाऊ नजरकडे आले आणि त्यांनी त्याला या हल्ल्याबद्दल सांगितले. त्यानंतर ते नजरसमोर मान तुकवून उभे राहिले आणि त्याच्या पुढील आज्ञेची प्रतीक्षा करू लागले.

नजरने युद्ध शब्द ऐकला मात्र आणि तो महालाबाहेर धावला. त्याच्या मनात एकच विचार होता. जितक्या लवकर जमेल तितक्या वेगाने त्याला आपल्या घरी पोचायचे होते. सर्वांना वाटले की तो पुन्हा एकटा आणि नि:शस्त्र शत्रूवर हल्ला करू इच्छितो आहे. म्हणून त्यांनी नजरला वाटेत अडवले आणि त्याला स्वत:ला शस्त्रास्त्रांनी सज्ज करून घेण्याची विनंती केली.

शस्त्रे आणली गेली. त्याच्या पत्नीने आपल्या भावांना नजरला एकट्याला बाहेर न जाऊ देण्याविषयी आणि शत्रूचा एकट्याने मुकाबला न करू देण्याची विनंती केली. नजर बहादूर एकट्याने शत्रूचा नायनाट करू इच्छितो आहे अशी बातमी वाऱ्याप्रमाणे सगळीकडे पसरली. सगळ्या लोकांनी ऐकली. सैनिकांनी ऐकली. शत्रू गोटातील सैन्यापर्यंत सुद्धा ही सूचना पोचली. पाठोपाठ सात दिग्गज योद्ध्यांसोबत नजर येत असल्याची बातमीही येऊन थडकली.

रणांगणी पोचल्यानंतर नजरला एका मोठ्या काळ्या घोड्यावर बसवले गेले. आणि सैनिकांनी ओरडायला सुरुवात केली:

“बहादूर नजर अमर असो! शत्रूचा नायनाट होवो!”

इथे घोड्याला मात्र लक्षात आले की त्याच्या पाठीवर स्वार व्यक्ती कुणी खूपच कमी दर्जाची घोडेस्वार आहे, म्हणून त्यानेच स्वत:ला सरसावले आणि तो शत्रूच्या दिशेने सुसाट पळत सुटला. योद्ध्यांना आणि त्यांच्या सेनापतींना वाटले की नजर कुणाच्याही मदतीची वाट न पाहता शत्रूवर एकटाच हल्ला करू पाहतोय. त्यामुळे ते सुद्धा उत्तेजित होऊन विजयी स्वरात मोठमोठ्याने ओरडत नजरच्या मागून हल्ला करण्यास पोचले. आपल्या घोड्याला नियंत्रित करण्यात नजर असमर्थ होता. घोडा वेगाने पळत असताना त्याच्यावरून उडी मारून उतरण्याच्या उद्देशाने नजरने एका झाडाच्या फांदीला पडकले.

पण नेमके ते झाड आतून पोखरलेले आणि सुकलेले होते आणि फांदी तुटून नजरच्या हातात आली. त्यामुळे नजर आता हातात एक प्रचंड मोठी फांदी घेऊन शत्रूच्या दिशेने सरपट दौडत चाललेला दिसून आला.

शत्रूचे सैनिक त्याच्या शौर्याची प्रसिद्धी ऐकून आधीच घाबरलेले होते. आणि आता जेव्हा त्यांनी हे दृश्य पाहिले तेव्हा त्यांनी सरळ माघार घेतली आणि ओरडत किंचाळत पळू लागले, “आपले प्राण वाचवायचे असतील तर पळा, नजर बहादूर चालून येत आहे. वाटेत येणाऱ्या झाडांना सुद्धा मुळापासून उखडून टाकत आहे!”

त्या दिवशी बरेच शत्रू मारले गेले आणि जे जिवंत उरले त्यांनी नजरच्या पायांशी शरणागती पत्करली, आणि त्याच्याप्रती कायम निष्ठावान राहण्याची शपथ घेतली.

मोठ्या आनंदी आणि उत्साही वातावरणात नजर बहादुरला महालात आणले गेले. लोकांनी त्याच्या सन्मानार्थ विजयी कमानी उभारल्या आणि “हुर्रे!” आणि “नजर बहादूर अमर रहे” च्या घोषणा आणि संगीत आणि गायन आणि अगणित भाषणे यांनी त्याचे जोरदार स्वागत केले. नजर स्वत: पण या स्वागताने बराच भारावून गेला.

या महान विजयानंतर नजरला राजा घोषित केले गेले आणि समारंभपूर्वक राज्याभिषेक करून त्याला सिंहासनावर बसवले गेले. सातही योद्धे त्याचे सल्लागार नियुक्त झाले. नजरने पाहिले की सगळे जग जणू त्याच्या पायाशी लोळण घेत होते.

लोक म्हणतात की नजर बहादूर अजूनही तिथे राजा आहे, आणि लोक जेव्हा त्याच्या समोर शौर्य, बुद्धिमत्ता किंवा प्रतिभेच्या गप्पा मारतात तेव्हा तो हसतो आणि म्हणतो:

“कसले शौर्य आणि कुठली बुद्धिमत्ता? हे सगळे पोकळ शब्द आहेत. हा निव्वळ नशीबाचा खेळ आहे. जर तुम्ही नशीबवान असाल तर तुम्ही निश्चितच सुख भोगाल!”

आणि लोक म्हणतात आजही नजर बहादूर सुखी आहे आणि सगळ्या जगाला हसत आहे.



HOVHANNES TOUMANIAN
The Master and the Labourer
Nazar the Brave